Review Of Research
Vol. 4 | Issue. 2 | Nov. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# पिढीपेस्तर प्यादेमात मधील 'स्त्री' जीवनाचे चित्रण

**प्रा.सुभाष जयसिंग कदम**
**मराठी विभाग , कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर,**
**जि.सोलापूर,,महाराष्ट्र.**

**प्रस्तावना :**

संतोष पद्माकर पवार यांनी 'स्त्री' च्या वेदना अनेक कवितेतून मांडलेल्या आहेत. 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्य संग्रहात एकूण '७८' कविता आहेत. या कवितासंग्रहात कवींने कवितेच्या आशयानुसार चार विभाग केले आहेत.

१)झडती एक – बाईपणाच्या मातीची
२)झडती दोन – मजुरांच्या घामाची
३)झडती तीन – गावखुरीच्या शेतीची
४)झडती चार – कुणब्याच्या जीवाची

कवीनी ग्रामीण स्त्रीजीवन खऱ्या अर्थाने मांडले आहे. ग्रामीण भागातील 'ग्रामसंस्कृती' ही अनेक रूढी–परंपरा, चालीरीती यांनी अलिखित नियम बंधनात असते. या सगळया व्यवस्थेत 'स्त्री जीवनावरती अनेक नियम बंधने लादलेली आसतात. या 'स्त्री' वेदनेला वाचा देण्याचे काम संतोष पद्माकर पवारांची कविता करते. 'स्त्री' दु:खांनविषयी या व्यवस्थेवर तीव्र संताप व्यक्त करताना कवी लिहतो...

''सटवी लिहिती अक्षर
ब्रहम करिती तातडी
नारीच्या जलमाची
रेघ पडली वाकडी''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.क्र.४.)

कवी संतोष पद्माकर पवार स्त्रीच्या, गुलामगिरीची परंपरा सांगताना 'स्त्री' देवता 'सटवी' ला दोषी ठरवितात. म्हणूनच या कवितेविषयी एकनाथ पगार म्हणतात की, ''स्त्री जीवनाशी समरस घेऊन स्त्रीमन जाणून घेणाऱ्या संवेदनक्षम कविता, संस्कारक्षमता असलेल्या कविता बाईपणाच्या मातीची झडती या भागात आहेत.''[१] (पगार एकनाथ 'कवितारती' जानेवारी–फेब्रुवारी २०१०)

स्त्रीजीवन हे अनेक नाते संबंधाने बंदिस्त असते. जन्मभर ग्रामीण स्त्री दुसऱ्यावरती अवंलबून राहत आसते. जन्म झाल्यानंतर वडिलांच्या तर लग्न झाल्यावर पतीच्या इच्छे प्रमाणे तिला रहावे लागते, तर म्हातारपणी मुले सांगतील तसे जगावे लागते. हेच वास्तव या कवितेतून कवीने मांडले आहे.

स्त्री जन्माला आल्यानंतर तिला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू, आजी अशा वेगवेगळया भूमिका पार पाडाव्याच लागतात. स्त्रीला स्वतःचे अस्तित्व बाजुला सारून पुरूषप्रधान संस्कृतीत आयुष्यभर दुसऱ्यासाठी जगावे लागते. हे स्त्रीजगणं मांडताना कवी लिहतात–

''माहेराला माती होती सासराला माती माती
माती जन्माची सोबती कायबाई जीवाखाती''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.५.)

कवीने स्त्रीची तुलना 'माती' शी केली आहे. स्त्री व माती दोघी नवनिर्मिती करतात. असे कवीला वाटत असावे. या स्त्रीच्या गुलामगिरी विषयी आजपर्यंत अनेक महात्मांनी आवाज उठवीला आहे. याच स्त्रीच्या हुंदक्याला कवींनी शब्दांतून मांडले आहेत.

माय तिच्याही मायची सांग झाली कायगत
जन्मभर राबूनही नाही दमडीची पत
सासरच्या साऱ्या वाटा इथं मसणाला जाती
माती जन्माची सोबती कायबाई जीवा खाती
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.५.)

स्त्री दुःखाचे वास्तव कवी मांडतात. जन्मभर स्त्रीला पुरूषप्रधान संस्कृतीत कष्टच करावे लागते. याचे वास्तव कवी मांडतात.

स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिचे आवघे आयुष्य बदलून जाते. सासरी गेल्यानंतर प्रत्येक स्त्रीला सासरच्या प्रत्येक माणसाची मर्जी सांभाळावी लागते. म्हणुनच प्रत्येक मुलगी सासरी जाताना त्या मुलीची आई आपल्या मुलीला सर्वांशी चांगले राहण्याची विनंती करते. हीच मायच्या मनातील हुदंका कवीनी शब्दांतून मांडला आहे.

''सासरला जाणं म्हंजे शीर उखळात देणं
पडल त्या मुसळीचा घाव अंगावर घेणं
बोली बाईच्या जातीची कोण्या देवानं बोलली''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.७.)

कवी परखड शबदात या व्यवस्थेतील देवांलाच प्रश्न करतात. हे स्त्रीचे जीवन कोणी तिच्या वाट्याला आणले आहे. 'स्त्री' च्या वेदनेला खऱ्या अर्थाने वाचा देण्याचे काम कवी करतात.

या व्यवस्थेने स्त्रियांना पुशवत जीवन प्रधान केले आहे. विशेषतः आजही ग्रामीण भागातील स्त्रियांना आयुष्यभर पहाटेपासून गुरासारखे राबावे लागत आहे. म्हणूनच कष्ट हे स्त्रियांच्या पाचवीलाच पुजले आहे. अशी भावना येथे व्यक्त करताना कवी लिहतात–

''किती उचलाव्या शेऱ्या जशा भुईतून येती
गुरढोरात राबून तूही जित्राब भासती
त्यांच्या पोळयापायी तुझी दिवाळीला होळी होती
माती जन्माची सोबती काय बाई जीवा खाती''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.५.)

वर्षभर शेतात राबणारे गुरे–ढोरे बैल–गाय यांना वर्षातून एकदा 'बेंदूर' या दिवशी मान दिला जातो. पण या प्राण्यापेक्षा वाईट अवस्था 'स्त्रींची' आहे. अशी खंत कवी व्यक्त करतात.

'चुल आणि मुल' हेच स्त्रियांचे जगणे या व्यवस्थेने तिच्यावर लादलेले आहेच. पण या जगण्यात कधी कधी एक 'स्त्री' दुसऱ्या स्त्रीची कशी दुष्मण असते. याचे चित्रण करताना कवी लिहतात की,

भांड लागता भांडयाला येई ऊन भांडण्याला
मिळे राईचा पर्वत उखळात कांडण्याला
बाप धावे लेकावर लेक मारी बायकूला
मार बसता सुनेला मिळे थंडावा सासूला''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.१२.)

सासुरवाशीन स्त्रियांना कशा पद्धतीने छळले जाते याचे चित्रण कवी येथे मांडतात 'स्त्रीला' छळण्याची अनेक कारणे असतात. मग कधी हुंडा मागणीसाठी तर कधी वंशाला दिवाच हवा, मुलगी नको म्हणून असे अनेक कारणाने स्त्रियांना छळले जाते हेच वास्तव कवी 'बोल सये' या कवितेतून मांडतात.

''तुझ्या हातावर डाग कशाचा ग बाई
तुझ्या संगतीने इथं मी मातीत बाई
बोल सये, बोल अगं  मनातलं बोल
.....बारवेचा तळ सांग किती खोल''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.क्र.९.)

संतोष पद्माकर पवार यांनी स्त्री मनाचा तळ शोधण्याचे काम येथे केले आहे. स्त्रियांच्या या छळामुळे शेवटी तिला आत्महत्या करावी लागते याचे चित्रण कवी करतात.

कवी ग्रामीण स्त्रीयांच्या जगण्यातील वास्तव सांगताना 'बाप – सात पोरीचा' या कवितेतून सातपोरीच्या बापाची वेदना व्यक्त करतात. मुलीचे लग्न करणे म्हणजे खूप मोठी जबाबदारी असते. नवरदेवाच्या अपेक्षा आज खुपच वाढलेल्या आहेत. मग अशा अवस्थेत एखाद्या माणसाला सात पोरी आसतील त्याने काय करावे व हेच दुःख प्रस्तुत कवितेतून कवी मांडतात.

''साऱ्या सात पोरीसाठी कसे मिळावे दादले
रंग रूप कसनुसे ते तं देवाचे गोंदले
रात रात येडा बाप काळजीत झोपेचना
माळ इद्रया सपनाची काही केल्या संपेचना''

येथे कवीने ग्रामीण समाजातील वास्तव मांडले आहे. सात मुलींचे संगोपण करणे म्हणजे कसरत व त्यानंतर लग्नाच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी मानपानासाठी लोक पोरीच्या बापाला गोड बोलून लुबाडतात हे वास्तव आज ग्रामीण समाजात असते.

स्त्री सौंदर्याविषयी कवीने येथे, एक वेगळेच सत्य मांडले आहे. 'सर घातला गळयात' या कवितेतून दागिने स्त्री सौंदर्य व पुरूषप्रधान संस्कृतीतील नीतीतत्व मांडले आहे.

''जित्राबाच्या गळी घंटा
चहुलीस बांधतात
तसे तुझे दोन्ही हात
काकणात कोंबतात
मनी मंगळाच सुत्र
तुझं करीत वाटोळं
गळयातल्या देव्हाऱ्यात
जसं सापाचं येटोळं''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.१७.)

या व्यवस्थेने स्त्री–सौंदर्य व दागिने यांच्या पाठीमागील गुलामगिरीची भावना येथे व्यक्त केली आहे. म्हणूनच या कवितेविषयी एकनाथ पगार म्हणतात की, 'स्त्री रूपाचा साऱ्या हालचाली, विचारक्रिया दडपून टाकण्यासाठी दागिन्यांचा वापर केला जातो. स्त्रियांना भासवले जाते, ते म्हणजे आम्ही तुमच्या सौंदर्यात आणि सौभाग्यात भर घालत आहोत. या भासकृतीमागील सत्ताधारी पुरूषांची वर्चस्ववादी भूमिका असते'' (पगार एकनाथ 'कवितारती' जानेवारी फेब्रुवारी २०१०)

पुरूषप्रधान संस्कृतीने दागिने निर्माण करण्याच्या पाठीमागे हाच हेतू आसावा. मात्र आज आपण पाहतो की स्त्रियांना दागिन्याची ओढ असतेच त्यामुळे त्यांचे हे दागिन्याचे गुलामपण अबाधित आहे असे वाटते.

'स्त्री' च्या सभोतालची सर्व नाती कशी असतात व त्यामध्ये 'स्त्रीची' होणारी कुचंबना कवी 'बाई रोजच्या घागरी' व 'भांडण' या कवितेतून मांडतात. सासूरवाशीन स्त्रीला, सासू, सासरा, दीर, नणंद कशी छळतात यांचे वास्तव कवी येथे मांडतात.

''कशी तुझी सासू व्दाड करी सुईचं मुसळ
लोणी नाहीच येणार तिची मायाच पातळ
तुझा दीर भडभुंडया लाहीवाणी तडकीतो
त्याची वालीबी येईन वहीवाट दाखवितो
तुझी नणंद भवानी तुझी गाये रडगाणी
उद्या तिच्याबी नशिबा बोल लावीलच कुणी
तुझा सासरा कसला भात डोळयावं बांधितो
कोल्हेकुईला रोजच्या मुंडी मुंक्यानं हालितो''
('पिढीपेस्तर प्यादेमात' – पृ.१४.)

कवी येथे सासुरवाशीनीच्या दुःखांना वाचा फोडतात. पूर्वीच्या ग्रामीण स्त्रीला जगताना सासुरवास असेल. पण आजचे ग्रामीण स्त्री जीवन बदलले आहे. आजची स्त्री शिक्षण घेत आहे, त्यामुळे अन्यायाचा प्रतिकार करते. त्यामुळे हे वास्तव आजच्या ग्रामीण भागात कमी झाले आहे. कवीच्या अनुभवविश्वातून या कविता आलेल्या आसाव्यात त्यामुळे कवी मनातील स्त्री दुःखांची संवेदना येथे व्यक्त होताना दिसते.

'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहात 'झडती–बाईपणाच्या मातीची' या काव्यसंग्रहात एकूण सतरा कविता आहेत. स्त्रियांच्या छळाचे वर्णन करताना कधी कवी व्याकुळ होतात. तर काही ठिकाणी कवीच्या संवेदनशील मनातील आपुलकी, प्रेम, आपलेपणा व माणुसकीचे दर्शन घडते.

**संदर्भ ग्रंथ**

१) पगार एकनाथ 'कवितारती' जानेवारी–फेब्रुवारी २०१०.
२) पवार संतोष पद्माकर 'पिढीपेस्तर प्यादेमात' पॉप्युलर प्रकाशन २००८.